रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

माण देशी महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा

२२ वा वार्षिक अहवाल सन २०१८-२०१९

ऑडीट वर्ग 'अ'

संचालक मंडळ (सन २०१६-१७ ते २०२१-२२)

माण देशी
बँक

श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)

सौ. ललीता सा. पोळ
उपाध्यक्षा (देवापूर)

सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)

सौ. राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)

सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)

सौ. राणी वि. बनगर
संचालिका (म्हसवड)

सौ. रोहिणी ता. बाड
संचालिका (पर्यंती)

सौ. सत्यभामा बा. खाडे
संचालिका (पळशी)

सौ. रेखा अ. कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)

सौ. रोहिणी प्र. कारंडे
संचालिका (दहिवडी)

सौ. अश्विनी वि. पवार
संचालिका (उंबर्डे)

सौ. सुवर्णादेवी न. पाटील
संचालिका (सातारा)

श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु.।।)

सौ. दिपाली गवळी
तज्ञ संचालिका (कोल्हापूर)

सौ. रेखा कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

महिला व बालविकास मंत्रालय भारत सरकार यांच्या तर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांना दि. ८ मार्च २०१९ रोजी
''नारी शक्ती'' पुरस्काराने राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे गौरविण्यात आले त्याप्रसंगी
मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी व मा. मनेका गांधी, महिला व बालविकास मंत्री यांच्या समवेत घेतलेले छायाचित्र.

श्रीमती चेतना सिन्हा यांना ''लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर'' या पुरस्काराने दि. २० फेब्रुवारी २०१९ रोजी
सन्मानित करण्यात आले समवेत मा. श्री. उद्धव ठाकरे, शिवसेनाप्रमुख, मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील,
मंत्री महसूल, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य, सौ. रश्मीताई ठाकरे, व माण देशी महिला

माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड ता. माण जि. सातारा

रजि.नं.-एस.ए.टी./माण/वी.एन.के./ओ./११९,सन१९९६ दि.३१/१०/९६

बावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

माण देशी महिला सह.बँक लि.म्हसवड बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची बावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. १४।०९।२०१९ रोजी दुपारी १२ वाजता सिद्धनाथ मेगासिटी माण देशी वेअर हाऊस, म्हसवड येथे बँकेच्या अध्यक्षा मा. श्रीमती चेतना विजय सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

• सभेपुढील विषय •

१. दि. ०१/०९/२०१८ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा मा.संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०१९ अखेरच्या मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०१८-२०१९ चे शासकीय लेखापरीक्षण अहवाल व त्याचा दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
६. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७. सन २०१९-२०२० सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०१८-२०१९ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

स्थळ :- म्हसवड
दिनांक: ३०/०८/२०१९

(सौ. रेखा सु. कुलकर्णी)
मुख्य कार्यकारी अधिकारी

विशेष सुचना :-

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. कामकाजासंदर्भात विचारावयाचे प्रश्न आणि सूचना दि. ७/०९/२०१९ पूर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.
३. बँकेचा ३१/०३/२०१९ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावरती प्रसिद्ध केले आहे, तसेच बँकेची वेबसाईट www.manndeshibank.com वर प्रसिद्ध केली आहे.

सन्माननीय सभासद भगिनींनो,

मी जेव्हा २२ वर्षापूर्वी माण देशी महिला सहकारी बँक काढण्याचा विचार केला तेव्हा गरिब महिलांना बँकेत खाते उघडणे फार अवघड जात होते. बँकांनाही अस वाटायच की, गरिब महिलांना बँकिंग सुविधा पुरविणे बँकांना परवडणारच नाही. आपली पहिली ग्रामीण महिला बँक आहे जी महिलांसाठी आहे आणि महिलाच चालवितात. आज, देशातील महिला बँकापैकी एक आपली बँक आहे आणि आता हे लक्षात येते की महिलांना बँकेत बचत खाते उघडणे अवघड नाही पण कर्ज मिळविणे मात्र तितकेच अडचणीचे आहे.

या वर्षी बँकेने मार्च २०१९ अखेर ठेवीचा १०० कोटींचा आकडा ओलांडून यश मिळवले आहे. माण तालुक्यातील म्हसवड सारख्या भागातून सुरु होवून, बँकेने मुंबईपर्यंत मजल मारलेली आहे.२० ऑक्टोबर २०१८ रोजी माण देशी बँकेची कामोठे, नवी मुंबई येथे ८ वी शाखा सुरु झाली आहे. आपल्या महिला आता एटीएम बरोबर मोबाईल बँकिंग करायला देखील सज्ज झाल्यात. आता त्या त्वरित एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये पैसे पाठवू शकणार आहेत. थोडक्यात, जे हात मातीत काम करत होते, तेच हात आता मोबाईल बँकींग करीत आहेत. ही झेप माण देशी बँक घेवू शकली ती केवळ बँकेच्या सभासदांमुळेच, आणि त्यांची मी शतश: ऋणी आहे. बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावले असले तरी तिचे लक्ष्य हे बँकेचे महिला सभासद आणि त्यांचा विकास हेच राहिलेले आहे. माण देशी महिला अशिक्षित असल्या तरी त्या व्यवहारज्ञानात पुढे आहेत. जगातील ही पहिली बँक आहे की जिचा परवाना महिलांनी रिझर्व्ह बँकेकडून स्वत: जावून मिळविला.

माण देशी महिला बँकेने निरनिराळ्या व्यवसाय करणाऱ्या महिलांना म्हणजे त्या भाजीपाला विक्रेत्या, दुग्ध व्यवसाय करणाऱ्या महिला अशा ग्रामीण भागातील महिलांना कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. हि देशातील अशी ग्रामीण बँक आहे जीने महिलांना बँकेबल केलं आणि महिलांनीदेखील हे सिद्ध करुन दाखवले कि, ग्रामीण व गरजू महिलांना ज्यावेळी कर्ज दिले तर ते वेळेवर फेडतात याबरोबरच त्या बचतदेखील करतात.

माण देशी महिला ''उद्योजिका'' म्हणून चांगल्या नावारुपाला आल्या आहेत. आपला माल त्या परदेशात पाठवू लागल्या आहेत. व्हाटसअप, फेसबुक चा वापर करुन ऑनलाईन मार्केटींगमध्ये उतरल्या आहेत. मुंबईच्या मोठमोठ्या कंपन्या महिलांना त्यांच्या कंपनीमध्ये स्टॉल लावणेसाठी आमंत्रित करत असतात. गर्वाची गोष्ट म्हणजे महिला रेडिओ, टीव्हीवर कार्यक्रम देत आहेत. विमानात बसून दिल्लीला जावून भाषण ठोकून पारितोषिक देखील पटकावीत आहेत. या उद्योजिका महिलांची व्यवसाय वाढीची गरज इतकी वाढली आहे की त्या मोठ्या कर्जाची मागणी करत आहेत. खास अशा महिलांच्या उद्योगासाठी बँकेने ''उन्नती कर्ज'' योजना देखील सुरु केलेली आहे.

मला आज अभिमान आहे माझ्या माण देशी महिलांचा की जे हात मातीत काम करत होते ते आज मोबाईल बँकींग करत आहेत. हा आत्मविश्वास माण देशी महिला बँकेला ग्रामीण भागातील महिलांनीच दिला. त्या कोठेही कमी पडल्या नाहीत. त्यांना गरजेवेळी शिक्षण मिळाले नाही, पण त्यांना ज्या ज्या वेळी संधी मिळाली त्या संधीचे त्यांनी सोनं केल. आता एटीएमचा वापर त्या करतातच सोबत त्यांनी आपली वाटचाल मोबाईल बँकिंगकडे वळवली आहे. तंत्रज्ञानाचे कुठलेही शिक्षण नसताना या महिला आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपले व्यवसाय डिजीटल करत आहेत.

माण देशीने ज्यावेळी काम चालू केले त्यावेळी अस लक्षात येत होतं की, आपण ग्रामीण त्यातल्या त्यात दुष्काळी भागात ही बँक उभी करत आहे. जिथे दुष्काळी भागात शेतकऱ्यांना पाण्याचे आव्हान असते व पाण्याअभावी शेती करणे हा मोठा प्रश्न असतो. अशा परिस्थितीमध्ये उद्योग उभे करणे ही सोपी गोष्ट नाही. त्यातूनही याभागात महिला उद्योजक पुढे येत आहेत व त्यांच्यामूळे आज बँक एवढी बळकट झालेली आहे. उदा. या वर्षी दुष्काळामध्ये माण देशी फौंडेशन चारा छावणी चालू केली. छावणीमध्ये पण आपली जनावरं पाळूण महिलांनी आपला दुग्धव्यवसाय चालूच ठेवला. या शेतकरी महिलांचे जवळजवळ रोजचे १० लिटर दुध डेअरीला जाते. अशा परिस्थितीमध्ये सुद्धा त्या मुला-मुलींना शिक्षण देत आहेत.

या वर्षीची विशेष बाब म्हणजे माण देशी उमेद अर्थात महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान व वर्ल्ड बँक सोबत भागीदारी करुन सोलापूर जिल्ह्यात देखील काम सुरु करीत आहे. तेथील एक हजार महिलांना व्यवसायवाढीसाठी सहकार्य व बँकींग सुविधा उपलब्ध करुन देणे जेणेकरुन त्या आपले व्यवसाय नावारुपाला आणू शकतील. या कार्यक्रमास ॲक्सेंच्युअरचे सहकार्य व वर्ल्ड बँकेचे मार्गदर्शन राहणार आहे.

माण देशी बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्याकडून यापुढे देखील आहे.

आपली स्नेहांकित,
श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दुष्काळी माण तालुक्यातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या प्रमुख उद्देशाने चेतना सिन्हा यांनी माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली. कारण महिला सक्षम झाल्यानंतर देश सक्षम होईल. या कार्यामुळे गेल्या एकवीस वर्षाच्या कालखंडात माण देशी महिलांना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची चालना मिळू शकली.

सन २०१६-१७ ची विशेष बाब म्हणजे, माण देशी महिला बँकेने ई कॉमर्स बँकिंग सुरु केले आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या म्हसवड, धायरी, सातारा, कामोठे शाखेमध्ये एटीएम मशिन सेवा सुरु केली आहे. बँकेच्या सर्व शाखांमध्ये एटीएम मशिन बसविण्याचा बँकेचा मानस आहे.

रुपे डेबिट कार्ड, एटीएम सेवा आपल्या शाखांमध्ये सुरु आहे. बँकेच्या ग्राहकांना रुपेकार्ड वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबरोबरच आठवडे बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी हे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या दारात म्हणजेच व्यवसायाच्या ठिकाणी एटीएमच्या माध्यमातून सेवा पुरविण्याची सोय निर्माण झाली आहे. याबरोबरच माण देशी बँकेने आरटीजीएस, एनईएफटी व एसएमएस बँकिंगसारख्या सुविधा देखील सुरु आहेत.

बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा:

१. कोअर बँकिंग: बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँकेकडे आपल्या मोबाईल नंबरची नोंदणी केली अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस द्वारे कळविल्या जातात.

२. रुपे डेबीट कार्ड: बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रुपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बँकेने ईएमव्ही रुपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरु केली आहे. याद्वारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स, पेट्रोल पंप, हॉटेल्स्, इन्शुरन्स इ. ठिकाणी रुपे कार्ड द्वारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रुपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएमची २४X७ सुविधा उपलब्ध करुन दिली असून देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

३. ए.टी.एम. सुविधा: माण देशी बँकेने शाखा म्हसवड, शाखा सातारा, शाखा धायरी व शाखा कामोठे (नवी मुंबई) अंतर्गत माण देशी बँकेची On site ए.टी.एम. सुविधा सुरु केली आहे.

४. मोबाईल बँकिंग लायसेन्स व आय एम पी एस सुविधा: माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड आता IMPS (Immediate Payment Service) सुविधे सहित, ज्या द्वारे ग्राहक पुढील सुविधांचा लाभ घेऊ शकतात १) त्वरीत एका खात्यामधून दुसऱ्या खात्यामध्ये पैसे पाठविणे. २) मिनी स्टेटमेंट ३) चेक बुक साठी पाठविणे. ४) या सुविधा द्वारे केलेल्या शेवटच्या ०५ व्यवहारांची माहिती मिळविणे.

५. मोबाईल बँक कलेक्शन सिस्टिम ॲप:- आता माण देशी बँकेमध्ये मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे टेक्नोस्पायर टेक्नॉलॉजीस् च्या Mobile Bank collection System(BCS) ची सुविधा सुरु करण्यात आली. आपण हे ॲप ॲण्ड्रॉईड मोबाईलमध्ये घेऊन ते माण देशी बँकेमधून ॲक्टिवेट करुन दैनंदिन collection किंवा वेगवेगळ्या बचत खात्यामध्ये Online अथवा offline या दोन्ही मोडमध्ये काम करु शकता व पैसे जमा करु शकता. तसेच बिझनेस करस्पोडंटस् हे ॲप अगदी सहज हाताळू शकतात. यामध्ये आपण बचत खात्यांमध्ये बँकेच्या अधिकृत एजंट (Business correspondent Agent) द्वारे पैसे भरु शकता.

६. एस एम एस सुविधा- पैशाचा व्यवहार झाल्यानंतर बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या खात्याला नोंद असलेल्या मोबाईल नंबर वरती त्वरीत SMS जातो व छोट्या वायरलेस Thermal printer द्वारे पैसे जमा केलेल्याची पावती देखील भेटते.

७. आय.एफ.एस.कोड: बँकेचा आय.एफ.एस.कोड(YESB0MAN001) असून तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमूद आहे. या कोडद्वारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

८. आरटीजीएस व एनईएफटी: बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्विकारली जाईल.

९. सीटीएस क्लिअरींग सुविधा: बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करुन दिली असून या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस) दुसऱ्या दिवशी संबंधीत खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

१०. पॅन कार्ड: बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करुन दिली असून ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

११. वीज बील: बँकेच्या शाखांमध्ये वीज बील स्वीकारण्याची सोय उपलब्ध आहे.

१२. ई-स्टेटमेंट: ई-स्टेटमेंट सुविधेद्वारे खातेदारांना रजिस्टर असलेल्या ईमेल आय डी वरती महिन्यातून एकदा, तिमाही, अर्धवार्षिक, वार्षिक, दररोज किंवा आठवड्यातून एकदा असे खात्याचे स्टेटमेंट मिळू शकते.

१३. ई-कॉमर्स सुविधा: रुपे डेबिट कार्ड च्या सहाय्याने आता आपण इंटरनेट च्या युगात वेळ व कष्ट वाचवून घर बसल्या कोणत्याही वस्तूची खरेदी करु शकतो. वीज बील, फोन बील अथवा कोणत्याही प्रकारचे बील रांगेमध्ये उभे न रहाता मिनिटासरशी भरु शकतो. डिश टिव्ही, मोबाईल रिचार्ज देखील करु शकतो.

२२ वा वार्षिक अहवाल सन २०१८-१९

भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. १० कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ६९०.७९ लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. ८१.४९ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ १३.३७ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ३८५७ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे १७८८ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या २८१५५ झाली आहे.

गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. २५५.२२ लाख होती. अहवाल वर्षात त्यात रु. ४०.९६ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. २९६.१८ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण १६.०५ % इतके आहे.

ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१८ च्या ठेवी रु. ९७५२.४१ लाखावरुन मार्च २०१९ अखेर रु. १०८४४.४७ लाख एवढ्या झाल्या आहेत. ही वाढ रु. १०९२.०६ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण ११.२०% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे. सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी. जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ६४१३.१२ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु. ५६९.२० लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०१९ अखेर ६९८२.३२ लाख एवढे असून कर्ज वाढीचे प्रमाण ८.८७ % आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१८-२०१९ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९५.८९% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ९०.३३% कर्जवाटप केले आहे.

थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण २.४८% इतके आहे व वसुली ९७.५२% झाली आहे. व NPA चे प्रमाण १.७२% आहे.

संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

सदरचा तपशील (महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५ (२) प्रमाणे) पा.नं. -१९ वर उपलब्ध आहे.

नफा वाटणी :- २०१८-१९ या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

चालू सालचा नफा	१०१२८३९९.९७
तपशील	रक्कम
राखीव निधी (२५% प्रमाणे)	२५३२०९९.९७
लाभांश ५% प्रमाणे(नफ्याच्या ३०.१०%)	३०४८५०६.००
इमारत निधी	२०१५६९४.००
गुंतवणूक चढउतार निधी	१२६६०५०.००
संशयित बुडीत कर्ज निधी तरतुद	१२६६०५०.००
एकूण	१०१२८३९९.९७

शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - ३०%   २) ओ.बी.सी. - ११%   ३) एन्. टी. ५%   ४) ओपन - ५४%

गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१९ या वर्षात रु. ४०११.३२ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक २८८९.२२ लाख व इतर बँकेमध्ये ११२२.०५ लाख अशी गुंतवणूक केलेली आहे.

अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१९ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण सी. ए. संगीता अग्रवाल, बी.आर.एम.ए.एस. अॅण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकौटंटस्, पुणे यांनी केले असून त्यांनी बँकेस बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले आहे.

प्रशिक्षण कार्यक्रम:-

दरवर्षीप्रमाणे सन २०१८-१९ मध्ये माण देशी बँकेद्वारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली, गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयावंर प्रशिक्षण देण्यात आले.

अ.क्र.	प्रशिक्षण विषय	प्रशिक्षणार्थी	प्रशिक्षक
१.	म.स.संस्था अधिनियम १९६० चे '' कलम १५६'' मध्ये बदल, अधिकार व अंमलबजावणी याबाबतचे प्रशिक्षण	श्री. प्रसन्न नारायणे व श्री. अनिल खंदारे	सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित, कराड
२.	एन.एफ.एस.टी.उम. ऑपरेशन्स	श्री. धनंजय भोकरे व सौ. रेश्मा जाधव	भारतीय राष्ट्रीय भुगतान निगम(NPCI)
३.	सायबर सिक्युरिटी प्रशिक्षण	श्री. धनंजय भोकरे	पुणे बॅक्स असोसिएन
४.	'' शहरी सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांसाठी कडिट मॅनेजमेंट''	सौ. हेमलता कोरे,सौ.जयश्री जाधव व सौ. स्मिता टकले	कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकींग (CAB), आरबीआय,पुणे
५.	सायबर सिक्युरिटी पॉलिसीबाबत प्रशिक्षण	श्री.धनंजय भोकरे	कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकींग(CAB), आरबीआय, पुणे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कमिटी मध्ये निवड:-

माण देशी महिला सह. बँकेच्या चेतना सिन्हा यांची रिझर्व्ह बँकेच्या कृषी बँकिंग महाविद्यालय पुणे येथे ''वित्तीय समावेशन घोरण सल्लागार समिती'' मध्ये कमिटी मेंबर म्हणून सन २०१८-१९ ते २०२३-२४ साठी नेमणूक झाली आहे.

बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. रेखा कुलकर्णी यांची देखील कृषी महाविद्यालयाच्या ''सल्लागार समितीच्या'' उपसमितीमध्ये सदस्य म्हणून नेमणूक झाली आहे. हि बँकेच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब आहे.

बँकेची वैशिष्ट्ये

* व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
* नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा * मोबाईल बँकिंग ॲपची सुविधा
* आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस. ई स्टेटमेंट बँकींग सेवा उपलब्ध.
* ए.टी.एम. मशीन व रुपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
* चेक ट्रंकेशन सिस्टिम (सी.टी.एस.)
* रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
* वीजबीले स्विकारण्याची सोय * महिलांसाठी UTI पेन्शन योजना
* आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
* आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी. कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
* जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
* व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.
* महिलांच्या नावावर स्थावर मालमत्ता असल्यास व्याजदरात १% सूट

ठेवीचे व्याजदर

सेव्हिंग्ज ठेव ३%	३६६ दिवस ते ४५६ दिवस ७.००%
१५ दिवस ते ४५ दिवस ४.००%	४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत ८.००%
४६ दिवस ते ९० दिवस ४.५०%	दामदिडपट ठेव-४ वर्षे ९ महिने २६ दिवस
९१ दिवस ते १८० दिवस ५.००%	दामदुप्पट ठेव -८ वर्षे ३ महिने
१८१ दिवस ते ३६५ दिवस ६.००%	५ वर्षाच्या पुढे - ८.५०%

* जेष्ठ नागरिक ०.५% जादा व्याजदर

बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०
शाखा कामोठे फोन:(०२२)२७४३०००१

शाखा म्हसवड, वडूज, गोंदवले व कामोठे येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.

* बँकर्स *

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुबंई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध,दहिवडी
आय.डी.बी.आय म्हसवड, राणंद, लोणंद, पुणे
एस.बी.आय. वडुज, दहिवडी, ॲक्सीस बँक सातारा
यस बँक, पुणे

शासकीय लेखापरिक्षक

के.जी.बी.ॲण्ड जे. असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्,कोल्हापूर

अंतर्गत लेखापरिक्षक

सी. ए. संगीता अग्रवाल भागीदार
बी.आर.एम.ए.एस. ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, पुणे

कायदेशीर सल्लागार

ॲड. भोईटे विलासराव एन.(सातारा)
ॲड. माने एस. एम.(म्हसवड)
ॲड. काझी एन. एच.(म्हसवड)

लेखापरीक्षण अहवाल

प्रति,
मा. सभासद
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड
ता. माण जि. सातारा

संदर्भ: आपले नियुक्ती पत्र क्र. मुख्य कार्यालय- ८५/०९/२०१८ दि. ०७.०९.२०१८

१. आम्ही माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०१९ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे आणि रोख जमा खर्च पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ८ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० मधील तरतूदीना अनुसरुन तसेच दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या व भारतात सर्वमान्य असलेल्या लेखातत्त्वांना अनुसरुन बनविण्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबींचा समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही कोणत्याही प्रकारच्या गंभीर चुका अथवा दोष विरहीत होतील. आर्थिक पत्रके तयार करताना बँक व्यवस्थापनानाने भौतिक व व्यावसायिक अनिश्चितता घटनांशी किंवा परिस्थीतीशी संबंधित बाबींचा अंतर्भाव केलेला आहे. बँक व्यवस्थापन बँकेच्या आर्थिक अहवाल प्रक्रियेवर पर्यवेक्षण करण्यास देखील जबाबदार असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकांवर मत नोंदविण्याची आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ महाराष्ट्र राज्य सहकार कायदा १९६० व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन केलेले आहे. त्या स्टॅन्डर्डनुसार आम्ही आमचे लेखापरीक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संर्दभातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होतो. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. लेखापरिक्षण मार्गदर्शन तत्त्वांचे पालन करताना जर एखादी गंबीर बाब राहिली असेल तर ती नेहमीच आढळेल यांची हमी देता येत नाही. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात.

लेखापरिक्षण करताना लेखापरिक्षण मार्गदर्शन तत्वांचे पालन करताना खालील बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

- लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौंटींग तत्वांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे , याचा सुद्धा समावेश होतो.
- लेखापरिक्षणामध्ये अंतर्गत नियंत्रण पद्धतीची प्रक्रिया विचारात घेतली जाते. मात्र त्याच्या प्रभावशिलतेवर मत मांडण्याचा अंर्तभाव होत नाही.
- बँकेत वापरण्यात आलेल्या लेखा धोरणांची योग्यता व बँक व्यवस्थापनाने केलेल्या लेखा अंदाजाचे संबंधित प्रकटीकरणाचे योग्य पद्धतीने मुल्यांकन केलेले आहे.

• लेखा तत्वाच्या आधारे तसेच व्यवस्थापनेच्या उपयोगाच्या योग्यतेवर आणि प्राप्त झालेल्या ऑडिट पुराव्या आधारे जर एखादी भौतिक अनिश्चितता घटनांशी किंवा परिस्थितीशी संबंधित आहेत किंवा नाही हे बँक व्यवसाय स्थिरतेच्या क्षमतेवर आहे. जर आम्ही असा निष्कर्ष काढला आहे की, जर एखादी भौतिक अनिश्चितता अस्तित्वात आहे, तर आम्ही आमच्या लेखापरिक्षण अहवालात संबंधित प्रकटीकरणाकडे लक्ष वेधले आहे किंवा असे काही खुलासे अपुरे पडल्यास आमचे मत सुधारित केले आहे. आमचे निष्कर्ष आमच्या लेखापरिक्षण अहवालाच्या दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या लेखापरिक्षण पुराव्यावर आधारित आहे.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपण व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरून महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौंटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदच्या बाबतीत दि. ३१.०३.२०१९ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची आणि

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २९ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनां अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क्र. १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ, ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकार क्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

३. लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

९. आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे अकौंटिंग स्टॅन्डर्डस चे सर्वसाधारण पणे योग्य रितीने अनुपालन करतात.

१. आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी जोडत आहेत.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल, त्यावरुन संस्थेने संबंधीत कायद्यानुसार अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवलेली आहेत.

३. लेखापरिक्षण अहवाल तयार करताना आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखांच्या अहवालांचा परामर्ष घेतला आहे.

४. आर्थिक वर्ष २०१८-१०१९ करिता संस्थेस वर्ग ''अ'' देण्यात आलेला आहे.

के. जी.बी. ॲण्ड जे असोसिएटस् करिता
चार्टर्ड अकौटंटस्

संतोष तासे
भागिदार
UDIN No:-19108925AAAABW1969

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ३१.०७.२०१९

माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

बँकेची प्रगती

अ. क्र.	तपशील	२००९	२०१०	२०११	२०१२	२०१३	२०१४	२०१५	२०१६	२०१७	२०१८	२०१९
	सभासद संख्या	९३९२	११३६६	११८७१	१२२२०	१४०५३	१७१७३	२२७०१	२५८३२	२४९७८	२६०८५	२८१५५
												₹ लाखात
१	भागभांडवल	१८३.५४	२२३.४२	२६०.०६	२७६.५३	३०८.८१	३८४.६७	४७०.००	५१७.३७	५४३.७०	६०९.३०	६९०.७९
२	एकूण ठेवी	१७८२.३०	२७२१.५६	३३३८.२५	४०००.००	४८०१.११	६३१८.००	७६३३.२९	८७८२.०७	८९४२.००	९७५२.४१	१०८४४.४७
३	एकूण कर्जवाटप	९९०.५८	१४४२.१४	२२४०.९९	२६४१.८३	२८५३.५९	३९५०.३७	५३१८.४८	५१९९.५२	५६८५.९३	६४१३.१२	६९८२.३२
४	गुंतवणूक	८७५.११	१०२९.९३	८३९.६१	११९१.३३	१७८७.३५	२२९२.३९	२२४१.४७	३४४०.७३	३०१०.९४	३४३१.७५	४०११.३२
५	खेळते भांडवल	२११४.११	३०८४.५३	३७३३.१५	४४९१.३१	५३७०.५३	७१५१.१४	८६३०.८७	९८७२.९७	१०१७०.२१	११११७.९५	१२४१५.९७

परिशिष्ट 'अ'

१) बँकेचे नांव	:- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड
२) मुख्य कार्यालयाचा पत्ता	:- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९
३) नोंदणी क्रमांक व तारीख	:- एस. ए. टी.(माण)/बी.एन.के.(ओ)/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६
४) रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख	:- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७
५) कार्यक्षेत्र	:- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हे

दि. ३१/०३/२०१९ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात)

शाखा-मुख्यालय		८
सभासद	१. अ वर्ग	२८१५५
	२. ब वर्ग	५३३४
वसुल भागभांडवल		₹ ६९०.७९
राखीव व इतर निधी		₹ ४५७.७७
ठेवी (₹ १०८४४.४७)	अ) बचत ठेव	₹१८४४.८९
	ब) चालू ठेव	₹ २६७.९८
	क) मुदत ठेव	₹८७३१.६०
कर्जे(₹ ६९८२.३२)	अ) तारणी	₹ ४३९७.५०
	ब) बिनतारणी	₹ २५८४.८२
	क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी	९५.८९%
	ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी	९०.३३%
बाहेरील कर्जे		₹ ०.००
गुंतवणूक (₹ ४०११.३२)	सातारा डी.सी.सी.बँक लि.	₹ २०२.९९
	शासकीय मान्यताप्राप्त रोखे	₹ २८८९.२२
	इतर	₹ ९१९.११
थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण		२.४८%
ऑडीटवर्ग		'अ'
नफा		₹१०१.२८
एकूण कर्मचारी		८०
खेळते भांडवल		₹ १२४१५.९७

रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. ५२ दि. २५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

अ. नं.	तपशील	३१/०३/१८	३१/०३/१९	वाढ/घट
१	भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)	१४.३१%	१६.३६%	२.०५%
२	भांडवल निधी तपशील			
	टायर- १ निधी	८८८.९९	१०५२.८१	१६३.८२
	टायर -२ निधी	५९.०८	७९.५१	२०.४३
	एकूण निधी	९४८.०७	११३२.३२	१८४.२५
	एकूण जोखीम मालमत्ता	६६२४.०३	६९२३.०७	२९९.०४
३	भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण			
	टायर- १ निधी	१३.४२%	१५.२१%	१.७९%
	टायर -२ निधी	०.८९%	१.१५%	०.२६%
	एकूण निधी	१४.३१%	१६.३६%	२.०५%
	गुंतवणूक व त्यांचे मुल्यांकन			
४	अ. एस.एल.आर गुंतवणूक			
	१. सरकारी कर्जरोखे	२२२९.९१	२८८९.२२	६५९.३१
	एकूण	२२२९.९१	२८८९.२२	६५९.३१
	ब. बँक व इतर गुंतवणूक			
	१. राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी	१०१७.०२	९१९.०५	-९७.९७
	२. डी.सी.सी.बँक ठेव	१८४.७७	२०२.९९	१८.२२
	एकूण	१२०१.७९	११२२.०४	**-७९.७५**
	क. शेअर्समधील गुंतवणूक (एम.एस.सी.बँक,डी.सी.सी.बँक, बँक असो.)	०.०५	०.०५	००.०
	एकूण (अ+ब+क)	३४३१.७५	४०११.३१	५७९.५६
	ड. मुल्यांकन			
	१. दर्शनी किंमत	२२८७.००	२९५५.५०	६६८.५
	२. पुस्तकी किंमत	२२२९.९१	२८८९.२२	६५९.३१
	३. बाजारभावाने होणारी किंमत	२२३९.९०	२८६७.६०	६२७.७

अ. नं.	तपशील	३१/०३/१८	३१/०३/१९	वाढ/घट
	ई. उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणूक तपशील	०.००	०.००	०.००
५	घरकुल, बांधकाम, व्यवसाय यासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील			
	१. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज	०.००	०.००	०.००
	२. घरकुल व दुरुस्तीअंतर्गत दिलेले कर्ज	५४०.३१	५६२.२१	२१.९
	एकूण	५४०.३१	५६२.२१	२१.९
६	शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे	०.००	०.००	०.००
७	संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे	०.००	०.००	००.००
	फंडबेस कर्जाचा तपशील	२०.००	०.२०	-१९.८
	नॉन फंडबेस कर्जाचा तपशील	०.००	०.००	०.००
८	ठेवीचा सरासरी व्याजदर	८.०५%	७.८३%	-०.२२%
९	एन.पी.ए. चा तपशील			
	अ. ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण	४.२४%	३.३२%	-०.९२%
	ब. निव्वळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण	२.०५%	१.७२%	-०.३३%
१०	एन.पी.ए. मुव्हमेंट			
	आरंभीची एन.पी.ए. रक्कम	२३३.९५	२७१.८५	३७.९
	+ चालु वर्षातील एन.पी.ए. खाती	२३५.९०	२२१.९३	-१३.९७
	- चालु वर्षातील वसुलीची रक्कम	१९८.००	२६२.०९	६४.०९
	शिल्लक एन.पी.ए. रक्कम	२७१.८५	२३१.६९	-४०.१६
११	एन.पी.ए. वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील			
	सब स्टॅन्डर्ड	८९.५४	१३१.५७	४२.०३
	डाऊटफुल एक वर्षापर्यंत	९४.२३	४९.२८	-४४.९५
	डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत	११.१६	३९.५९	२८.४३
	डाऊटफुल तीन वर्षापर्यंत	३.०७	४१.६५	३८.५८
	एकूण एन.पी.ए.	१९८.००	२६२.०९	६४.०९

अ. नं.	तपशील	३१/०३/१८	३१/०३/१९	वाढ/घट
१२	एन.पी.ए. तरतूदीमधील चढउतार			
	आरंभीची तरतूद	१०४.०१	१४३.४७	३९.४६
	+ चालु वर्षातील तरतूद	३९.४६	-२९.७	-६९.१६
	एकूण तरतूद	१४३.४७	११३.७७	-२९.७
१३	स्टॅन्डर्ड ॲसेट तरतूदीमधील चढउतार			
	आरंभीची तरतूद	२३.७०	२६.४७	२.७७
	+ चालु वर्षातील तरतूद	२.७७	३.२०	०.४३
	एकूण तरतूद	२६.४७	२९.६७	३.२
१४	नॉन परफॉर्मींग गुंतवणूकीपोटी केलेल्या तरतूदीमधील चढउतार			
	आरंभची तरतूद	०.००	०.००	०.००
	+ चालु वर्षातील तरतूद	०.००	०.००	०.००
	एकूण तरतूद	०.००	०.००	०.००
१५	गुंतवणूक चढउतार निधी			
	आरंभीची तरतूद	१३.८४	२३.८४	१०
	+ चालु वर्षातील वाढ व तरतूद	१०.००	१२.५	२.५
	एकूण तरतूद	२३.८४	३६.३४	१२.५
१६	गुंतवणूक,घसारा निधीमधील चढउतार			
	आरंभीची तरतूद	०.००	०.००	०.००
	+ चालु वर्षातील तरतूद	०.००	१०.७५	१०.७५
	एकूण तरतूद	०.००	१०.७५	१०.७५
१७	खेळत्या भांडवलाशी			
	१. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण	१२.९०%	१०.९९%	-१.९१%
	२. इतर उत्पनाचे शेकडा प्रमाण	०.६०%	१.४३%	०.८३%
	३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण	०.९८%	१.१३%	०.१५%

अ. नं.	तपशील	३१/०३/१८	३१/०३/१९	वाढ/घट
	४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण	०.६०%	०.८२%	०.२२%
	५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण	४.१७%	५.०९%	०.९२%
	६. प्रती सेवक व्यवसाय	२१८.४५	२२२.८३	४.३८
	७. प्रती सेवक नफा	०.९	१.२७	०.३७
१८	परकीय चलनामधील व्यवहाराची माहीती	लागू नाही		
१९	रिझर्व्ह बँकेने पेनल्टी आकारली असल्यास त्याचा तपशील	लागू नाही		
२०	रिस्ट्रक्चर केलेल्या कर्ज खात्यांचा तपशील	घरकुल कर्जे	एस.एम.ई.कर्जे	इतर कर्जे
	अ. स्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे			
	१. खातेसंख्या	०.००	०.००	०.००
	२. रक्कम	०.००	०.००	०.००
	३. तारण मुल्यातील घट	०.००	०.००	०.००
	ब. सबस्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे			
	१. खातेसंख्या	०.००	०.००	०.००
	२. रक्कम	०.००	०.००	०.००
	३. तारण मुल्यातील घट	०.००	०.००	०.००
	क. डॉऊटफुल रिस्ट्रक्चर केलेली कर्जे			
	१. खातेसंख्या	०.००	०.००	०.००
	२. रक्कम	०.००	०.००	०.००
	३. तारण मुल्यातील घट	०.००	०.००	०.००
	एकूण (अ+ ब + क)			
	१. खातेसंख्या	०.००	०.००	०.००
	२. रक्कम	०.००	०.००	०.००
	३. तारण मुल्यातील घट	०.००	०.००	०.००
२१	बँकेच्या स्थावर मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन केले असल्यास त्याचा तपशील			

22.i) Composition of National & Co-operative Investment

Sr. No	Issuer	Amount	Extent of below Investment grade Securities	Extent of unrated Securities	Extent of unlisted Securities
1	2	3	4	5	6
1	PSUs	--	--	--	--
2	FIs	--	--	--	--
3	Public Sector Banks				
	1) State Bank Of India	393.34			
	2) IDBI Bank Ltd.	150.71			
	3) Bank of Maharashtra	250.00			
	4) Bank of Baroda	125.00			
	Total	919.05			
4	Mutual Funds	0.00	--	--	--
5	Others				
	1. DCC Reserve Fund	31.36			
	2. Karad Urban Co-op. Bank	0.00			
	3. Satara DCC Bank Ltd.	171.64			
	Total	203.00			
6	Provision held towards depreciation	--	--	--	--

ii) Non - performing Non- SLR Investment

Particulars	Amount (₹ in Crore)
Opening Balance	----
Addition during the year since 1st April	----
Reductions during the above period	----
Closing Balance	----
Total Provisions Held	----

२३) ठेव विमा प्रिमियम तपशील:- (रक्कम ₹ लाखात)

ठेव कालावधी	रक्कम अदा तारीख	ठेव विमा प्रिमीयम रक्कम
०१.०४.२०१८ ते ३०.०९.२०१८	२७.०४.२०१८	५.८७
०१.१०.२०१८ ते ३१.०३.२०१९	०२.११.२०१८	५.२८

मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचा तपशील
सन २०१८-२०१९
महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५ (२) प्रमाणे-

तपशील	वर्ष आरंभी येणे रक्कम	आर्थिक वर्षात कर्जाऊ दिलेली रक्कम	आर्थिक वर्षात जमा झालेली रक्कम	वर्षा-अखेरची येणे बाकी	कॉलम ५ पैकी थकीत कर्ज
१	२	३	४	५	६
फंड बेस्ड (मुदत ठेव तारण कर्ज)	०.००	०.२०	०.००	०.२१	०.००
नॉन फंड बेस्ड	०.००	०.००	०.००	०.००	०.००
एकूण	०.००	०.२०	०.००	०.२१	०.००

मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड

'एन' नमुना

ताळेबंद पत्रक

रक्कम ३१।०३।२०१८	भांडवल व देणी	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
१०००००००.००	अधिकृत भागभांडवल		१०००००००.००
	१०० चे १०००००० भाग या प्रमाणे भाग		
६०९३०३२५.००	१) वसुल भागभांडवल		६९०७९३५०.००
	व्यक्तिगत	६९०७९३५०.००	
४५७७६७८१.३५	२) इतर निधी व तरतूदी		४९५४७६०६.५७
	राखीव निधी	१७५३१८००.१२	
	इमारत निधी	१२०८६००८.३८	
	लाभांश स. निधी	१५६८५.००	
	संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद	११३७६७५१.३८	
	गुंतवणूक चढउतार निधी	३६३४२३०.००	
	गुंतवणुक घसारा निधी	१०७५०००.००	
	स्टँडर्ड असेट तरतूद	२९६६५००.००	
	तांत्रिक विकास निधी	८४६२५.००	
	सभासद प्रशिक्षण निधी	१७५०००.००	
	निवडणुक निधी	६०२००६.६९	
०.००	३) बाहेरील कर्जे	०.००	०.००
९७५२४०९५५.९१	४) ठेवी		१०८४४७२२८.६८
	अ) व्यक्तिगत ठेवी		
	१) व्यक्तिगत मुदत ठेवी	६९६४१८८३७.००	
	(मुदत संपलेल्या ठेवी-७३४१२४.००)		
	२) संस्था ठेवी	१७७०१२२१७.००	
	ब) सेव्हिंग्ज ठेव		
	१) व्यक्तिगत सेव्हिंग्ज ठेव	१८४१२९८९७.९५	
	२) संस्था सेव्हिंग्ज ठेव	८७८६७.०३	
	क) चालु ठेव		
	१) व्यक्तिगत चालु ठेव	११८९३१४१.०३	
	२) संस्था चालु ठेव	१४९०५२६८.६७	
८९२३७.००	५) ओ.बी.सी. (नावे बाजुप्रमाणे)	०.००	०.००

दि. ३१।०३।२०१९ अखेर

रक्कम ३१।०३।२०१८	जिंदगी व येणी	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
४४२४७००२.१७	१. हातावरील शिल्लक	२७६३६६९०.४१	२७६३६६९०.४१
५५४९४५६३.१५	२. बँकेतील शिल्लक		७७२१३०४०.८२
	१) एम.एस.सी. आणि डी.सी.सी.बँक चालु ठेव खाते	११०८९७७५.८८	
	२) राष्ट्रीयकृत बँक चालू ठेव खाते	३१५७७१७२.६४	
	३) व्यापारी बँक चालू ठेव खाते	३४५४६०९२.३०	
	४) सहकारी बँक चालू ठेव खाते	०.००	
३४३१७५३५२.००	३. गुंतवणूक		४०११३२०२४.००
२२२९९१३२५.००	अ) सरकारी रोखे		२८८९२२४४६.००
	१) केंद्र सरकारी रोखे (Face Value Rs.2355.50लाख)	२२५२७६४८०.००	
	२) राज्य सरकारी रोखे (राखीव निधीसाठी)	४००२०२६.००	
	३) ट्रेझरी बील (Face Value Rs.600.00 लाख)	५९६४३९४०.००	
६८३०२०२७.००	ब) बँकेतील मुदत ठेवी		८०८००५७८.००
	१) एम.एस.सी. आणि डी.सी.सी.बँक मुदत ठेव खाते	२०२९९१०४.००	
	२) राष्ट्रीयकृत बँक मुदत ठेव खाते	६०५०१४७४.००	
	३) शेड्युल सहकारी बँक मुदत ठेव खाते	०.००	
३८७७०००.००	४. मल्टीऑप्शनल ठेव		३१४०४०००.००
	एस.बी.आय.मल्टीऑप्शनल ठेव	३१४०४०००.००	
४८००५०००.००	नॉन एस.एल.आर गुंतवणूक		५०००.००
	१) जि.मध्य.सह बँक शेअर्स	५०००.००	
	२) म्युचुअल फंड गुंतवणूक	०.००	
६४१३१२४९१.७४	५. कर्जे		६९८२३२२८३.९७
	अ) अल्प मुदत कर्जे		
	१) तारणी कर्जे	१३७४०४८४५.००	
	२) विनातारणी कर्जे	२४३७५४८७१.००	
	ब) मध्यम मुदत कर्जे		
	१) तारणी कर्जे	४५६७१८८७.७१	
	२) विनातारणी कर्जे	२५९८९६३२.२३	
	क) दिर्घ मुदत कर्जे		
	१) तारणी कर्जे	२४५४११०४८.०३	

'एन' नमुना ताळेबंद पत्रक

रक्कम ३१।०३।२०१८	भांडवल व देणी	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
७१२५८८९.००	६) थकव्याज तरतूद		३११७०९०.००
	१) एन.पी.ए. थकव्याज	३११७०९०.००	
१९०३७९३२.००	७) देणे व्याज		२१०९६९६१.००
	१) ठेवीवरील देणे व्याज	२१०९६९६१.००	
६७९९५४४.३७	८) इतर देणी व तरतूदी		७२९७०९५.२०
	१) ऑडिट फी देणे	७३२४४१.००	
	२) टी.डी. एस. देणे	८१५२४.००	
	३) आयकर देणे	७०००००.००	
	४) सरचार्ज देणे	२५३६१८.००	
	५) अनामत देणे	२८६३४१.००	
	६) शेअर्स सस्पेन्स	२८५००.००	
	७) कर्मचारी देणे बोनस	२००००००.००	
	८) कर्मचारी ग्रॅच्युटी देणे	७०२८७३.००	
	९) लाईट बिल देणे	४४६३३.००	
	१०) लाभांश देणे	१७११६७४.००	
	११) बिल देणे तरतूद	२९२०२१.००	
	१२) सी.जी.एस.टी.देणे	५३२७९.४४	
	१३) एस.जी.एस.टी.देणे	३९८८४.९१	
	१४) भविष्य निर्वाह निधी देणे	२०६२.००	
	१५) शेअर्स अनामत	३६८२४३.८५	
३४१३२५.४२	९) शाखा मिळवणी	०.००	०.००
६६८०१८.२२	१०) नफा		१०१२८३९९.९७
	१) मागील वर्षाचा शिल्लक नफा	०.००	
	२) नफा/तोटा खातेप्रमाणे		
	आयकर पुर्व नफा	१४०५९००३.९७	
	वजा:- आयकर	३९३०६०४.००	
	चालु वर्षाचा निव्वळ नफा	१०१२८३९९.९७	
११२२०१०००८.२७	**एकूण**	१२४४७१३७३१.४२	१२४४७१३७३१.४२

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

शासकीय लेखापरिक्षक
के.जी.बी.ॲण्ड जे असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, कोल्हापूर

दि. ३१।०३।२०१९ अखेर

रक्कम ३१।०३।२०१८	जिंदगी व येणी	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
४०८७५८५.००	६. येणे व्याज		४२७००१४.००
	१) सरकारी रोख्यावरील	४१८८७२३.००	
	२) बँक मुदत ठेवीवरील	८१२९१.००	
८९२३७.००	७. ओ.बी.आर.(जमा बाजुप्रमाणे)	०.००	०.००
७१२५८८९.००	एन.पी.ए.वरील येणे व्याज(जमा बाजुप्रमाणे)	३११७०९०.००	३११७०९०.००
०.००	८. शाखा मिळवणी	२८००.००	२८००.००
२०५३६२२०.५२	९. स्थावर व जंगम मालमत्ता		२५७०३१९२.७९
	१) फर्निचर व फिक्चर डेडस्टॉक	१४०५१०९५.२३	
	२) इलेक्ट्रीक डेडस्टॉक	५६०३४०१.१६	
	३) कॉम्प्युटर हार्ड व सॉफ्टवेअर डेडस्टॉक	३६६६५६७.७६	
	४) लॉकर डेडस्टॉक	२१६५८५२.५८	
	५) मोटरसायकल डेडस्टॉक	२१६२७६.०६	
५९४१६६७.६९	१०. इतर मालमत्ता व येणे		७४०६५९५.४३
	१) टेलिफोन डिपॉझिट	२०११५.००	
	२) इलेक्ट्रीक डिपॉझिट	८७९७५.००	
	३) नळ कनेक्शन डिपॉझिट	७५०.००	
	४) शिल्लक स्टेशनरी	६६७०४४.५०	
	५) एम.एस.इ.बी. बिल कलेक्शन (डिपॉझिट)	१३०००००.००	
	६) ॲडव्हान्स डेडस्टॉक(WIP)	२००००.००	
	७) ऑफिस भाडे डिपॉझिट	६३६०००.००	
	८) आयकर	२७९००००.००	
	९) पॅनकार्ड कुपन्स येणे	३१७७९.००	
	१०) टी.डी.एस. येणे	३३०५३९.३९	
	११) एम.एस.ई. बी. कमिशन येणे रक्कम	२६२६८४.७६	
	१२) कोटक विमा डिपॉझीट	२२५०००.००	
	१३) सी.जी.एस.टी.येणे	२८२०९५.५८	
	१४) एस.जी.एस.टी. येणे	२७९९३३.६२	
	१५) आय.जी.एस.टी. येणे	४७२६७८.५८	
११२२०१०००८.२७	एकूण	१२४४७१३७३१.४२	१२४४७१३७३१.४२

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

सौ. ललिता सा. पोळ
उपाध्यक्षा
व सर्व संचालक मंडळ

श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

'एन' नमुना

नफा-तोटा पत्रक

रक्कम ३१।०३।२०१८	खर्च	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
६५६१५०९७.००	१) व्याज दिले		६९०२३८१५.०९
	व्याज दिले ठेवीवरील	६९०२३८१५.०९	
	व्याज दिले बँक ओ.डी. वरील	०.००	
२१२३७५२६.५६	२) पगार व कर्मचारी भत्ता		२०८९५७९४.०९
	कर्मचारी पगार	१६२३१४७६.००	
	कर्मचारी भविष्य निर्वाह निधी	११२०७४३.००	
	भविष्य निर्वाह निधी प्रशासकीय खर्च	१२३५८३.००	
	कर्मचारी बोनस	२१७१४६८.००	
	कर्मचारी विमा	१२४९०२.०९	
	कर्मचारी रजा	३७५२४१.००	
	कर्मचारी ग्रॅच्युटी	६५००००.००	
	कर्मचारी प्रशिक्षण	९८३८१.००	
९८२१९.७३	३) संचालक मिंटींग खर्च		१५८११०.००
	संचालक मिंटींग भत्ता	१४१५५६.००	
	संचालक प्रवास भत्ता	१६५५४.००	
३९८९९४०.०१	४) कर,भाडे,विमा		६४१८५५४.८०
	ऑफिस भाडे	३२३०९०८.००	
	ऑफिस घरपट्टी व पाणीपट्टी	१००००.००	
	विमा खर्च, डी.आय.सी.जी.सी.	१०३८०४१.००	
	लाईट बिल खर्च	६४२४१०.००	
	वाहन कर	१७१६०.००	
	इलेक्ट्रीक खर्च	९६२३०.००	
	सी.जी.एस.टी. खर्च	४३५८९०.४०	
	एस.जी.एस.टी.खर्च	४३५८९०.४३	
	आय.जी.एस.टी.खर्च	४९८९२४.९७	
	ऑफीस मेंटेंनस	६१००.००	
	व्यवसाय कर	७०००.००	
३२००००.००	५) कायदेशीर खर्च	३६००००.००	३६००००.००
५६१९४०.३१	६) टेलिफोन व पोस्टेज खर्च		५६४५६१.२७
	पोस्टेज खर्च	२८२८०.८०	
	टेलिफोन खर्च आणि ब्रॉड बॅन्ड खर्च	५३६२८०.४७	
७७५८३१.००	७) ऑडीट फी व खर्च	६७९९३०.००	६७९९३०.००
	८) डेडस्टॉक दुरुस्ती व घसारा		७६२३०५२.५३
६६८५६१९.९७	घसारा खर्च	३९३०७९४.१२	
	डेडस्टॉक दुरुस्ती खर्च	५३५५७.५७	
	कॉम्प्युटर दुरुस्ती खर्च	२६७३५.०९	
	हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर खर्च	३६०९५१५.७५	
	सजावट खर्च	२४५०.००	

दि. ०१।०४।२०१८ ते ३१।०३।२०१९ अखेर

रक्कम ३१।०३।२०१८	उत्पन्न	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
११९४२८७५१.७१	१) व्याज आले		१३६४६२०८८.०९
	१) व्याज आले कर्जावरील	११७०१३७९४.००	
	२) व्याज आले सरकारी रोख्यावरील	१६७४२५१३.०९	
	३) व्याज आले गुंतवणूकीवरील	२७०५७८१.००	
६०४४२०.२५	२) कमिशन आले	९३१९०८.२७	९३१९०८.२७
६३५२४५१.८२	३) इतर उत्पन्न	७०३९०३६.९८	७०३९०३६.९८
९२८१००.००	४) सरकारी रोख्यावरील उत्पन्न	२४६१३५.००	२४६१३५.००
०.००	५) संशयित बुडीत कर्ज तरतुद	९५१०२९३.००	९५१०२९३.००

'एन' नमुना

नफा-तोटा पत्रक

रक्कम ३१।०३।२०१८	खर्च	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
७१४६४८.८८	९) प्रिंटीग,स्टेशनरी व जाहीरात खर्च		८२३०५५.६३
	स्टेशनरी खर्च	६३४२३२.४८	
	कॉम्प्युटर स्टेशनरी खर्च	३४७९१.९५	
	जाहिराती खर्च	१५४०३१.२०	
१२१५०६८२.१०	१०) इतर खर्च		१६१३८०८५.९६
	पिग्मी कमिशन	११२९५९०१.००	
	सल्लागार फी	६२३०३४.८६	
	प्रवास खर्च	९८०४०६.००	
	वार्षिक मिटींग खर्च	३०८७६१.१६	
	बँक सर्व्हिस चार्जेस	२०९१२५.१५	
	आदरातिथ्य खर्च	१२८८८५.१५	
	सणसुद खर्च	१२१२४३.००	
	सरकारी रोखे अमॉर्टरायजेशन	३२४५४.००	
	इनोग्रशन खर्च	१८२४७९.६०	
	कन्व्हीयन्स अलाऊसेस	१६७८१३.००	
	किरकोळ खर्च	३४४४१२.३८	
	वर्गणी खर्च	७४३८७.००	
	लॉकर भाडे	१७९७.००	
	फ्रॅकिंग चार्जेस	१६००.००	
	वसुली खर्च	२७७८.००	
	ए.टी.एम.NPCI चार्जेस	१४६६५५.०६	
	टी.डी.एस. खर्च	९५१३.६०	
	सुरक्षा खर्च	६५२५२३.००	
	बँक प्राथमिक खर्च	१००३४८.००	
	FSA प्रवास खर्च व भत्ता	७५३९६९.००	
४२२३३२५.००	११) इतर तरतूद		६८६०२०५.००
	संशयित बुडीत कर्ज निधी तरतूद	६५४०२०५.००	
	स्टँडर्ड असेट तरतूद	३२००००.००	
	१२)संशयित कर्ज निर्लिखीत	९५१०२९३.००	९५१०२९३.००
४२७२८७५.००	१३) इन्कम टॅक्स	३९३०६०४.००	३९३०६०४.००
६६६८०१८.२२	१४) आयकर नंतरचा निव्वळ नफा	१०१२८३९९.९७	१०१२८३९९.९७
१२७३१३७२३.७८	**एकूण**	१५४१८९४६१.३४	१५४१८९४६१.३४

लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यासपात्र राहून बरोबर आहे.

शासकीय लेखापरिक्षक

के.जी.बी.ॲण्ड जे असोसिएटस्

चार्टर्ड अकौंटंस्, कोल्हापूर

दि. ०१।०४।२०१८ ते ३१।०३।२०१९ अखेर

रक्कम ३१।०३।२०१८	उत्पन्न	रक्कम ३१।०३।२०१९	रक्कम ३१।०३।२०१९
१२७३१३७२३.७८	**एकूण**		१५४१८९४६१.३४

सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी

सौ. ललिता सा. पोळ
उपाध्यक्षा

श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

व सर्व संचालक मंडळ

सन २०१९ - २०२० चे

खर्च	३१/०३/२०१९ या अंदाजे खर्च	३१/०३/२०१९ या प्रत्यक्ष खर्च	वाढ	घट	२०१९-२०२० या अंदाजे खर्च
व्याज दिले					
ठेवीवरील	७५६४००००.००	६९०२३८१५.०९		६७१६१८४.९१	७६१९८८००.००
सेवक पगार, वोनसखर्च, सेवक विमा	२४००००००.००	२०७९७४१३.०९		३२०२५८६.९१	२०५१५०००.००
छपाई, स्टेशनरी व जाहीरात खर्च	१२०००००.००	८२४५२०.६३		३७५४७९.३७	१२०००००.००
एजंट कमिशन	१००००००००.००	१२०४९८७०.००	२०४९८७०.००		१२५०००००.००
पोस्टेज व टेलीफोन खर्च	८०००००.००	५६४५६१.२७		२३५४३८.७३	७५०००००.००
लाईट, ऑफिस भाडे, विमा, कर	८००००००.००	९६३६८९८.६३	१६३६८९८.६३		१००००००००.००
सॉफ्टवेअर खर्च					
संचालक मिर्टींग व प्रवास भत्ते	२०००००.००	१५८११०.००		४१८९०.००	२५००००.००
सेवक प्रशिक्षण खर्च	३६००००.००	९८३८१.००		२६१६१९.००	३०००००.००
वार्पिक अहवाल व सभा खर्च	३५००००.००	३०८७६१.१६		४१२३८.८४	४०००००.००
ऑडीट फी व ऑडीट खर्च	१२०००००.००	६७९९३०.००		५२००७०.००	१२०००००.००
घसारा व डेडस्टॉक दुरूस्ती खर्च	४५०००००.००	४४०४७०८.७०		९५२९१.३०	५००००००.००
वी डी डी आर व इतर तरतूद	२००००००.००	७९३५२०५.००	५९३५२०५.००		३००००००.००
इतर खर्च	३५०००००.००	४१३७९८९.८०	६३७९८९.८०		५००००००.००
आयकर	५२५००००.००	३९३०६०४.००		१३१९३९६.००	७६६६०००.००
संशयित कर्ज र्निलीखीत	०.००	९५१०२९३.००	९५१०२९३.००		
नफा	७९८२६००.००	१०१२८३९९.९७	२१४५७९९.९७		९३७१२००.००
एकूण	१४५०८२६००.००	१५४१८९४६१.३४	२१९१६०५६.४०	१२८०९१९५.०६	१६०१०१०००.००

अंदाज पत्रक

उत्पन्न	३१/०३/२०१९ चे अंदाजे उत्पन्न	३१/०३/२०१९ चे प्रत्यक्ष उत्पन्न	वाढ	घट	२०१९-२०२० चे अंदाजे उत्पन्न
व्याज आले					
१) कर्जावरील	११६४४२०००.००	११७०१३७९४.००	५७१७९४.००		१२९२५६०००.००
२) गुंतवणूकीवरील	३४८३०००.००	२७०५७८१.००		७७७२१९.००	३६२९०००.००
३) सरकारी रोख्यावरील	१५८०७०००.००	१६७४२५१३.०९	९३५५१३.०९		१८१४३०००.००
कमिशन	६२५०००.००	९३१९०८.२७	३०६९०८.२७		१००००००.००
लाभांश	६००.००	५००.००		१००.००	५००.००
लॉकर भाडे	१०००००.००	४८२६०.४१		५१७३९.५९	७२५००.००
इतर उत्पन्न	२५०००००.००	१४५६०५१.४२		१०४३९४८.५८	१४५००००.००
सर्व्हिस चार्जेस	२००००००.००	१३७६७९१.८६		६२३२०८.१४	१४५००००.००
सरकारी रोख्यावरील उत्पन्न	४००००००.००	४२१२२०९.४७	२१२२०९.४७		५००००००.००
चेक बुक चार्जेस	१२५०००.००	१९१३५८.८२	६६३५८.८२		१०००००.००
संशयित बुडीत कर्ज तरतुद	०.००	९५१०२९३.००	९५१०२९३.००		
एकूण	१४५०८२६००.००	१५४१८९४६१.३४	११६०३०७६.६५	२४९६२१५.३१	१६०१०१०००.००

माण देशी महिला सहकारी बँक लि.म्हसवड
पोटनियम दुरुस्तीबाबतची(पुरवणी ४९ वी)

पोटनियम अनुक्रमांक	सध्याच्या पोटनियमाची शब्द योजना	दुरुस्त झाल्याप्रमाणे पोटनियमाची शब्द योजना	दुरुस्तीचे कारण
49	**COMMITTEES OF THE BOARD:** "The Board shall constitute an Executive Committee and other committees or sub-committes as may be considered necessary,Each committee shall consists of not more than Five members."	**COMMITTEES OF THE BOARD:** a) The Board shall constitute an Executive Committee and other committees or sub-committes as may be considered necessary,Each committee shall consists of not more than Five members." The Board shall define the scope of work & delegate necessary powers to such committees. b) Board of Directors shall constitute Board of Management.The size of Board of Management, their qualification, Meetings, Sitting fees, Tenure of Board of Management and Function will be decided by the Board of Directors as per guidelines of Reserve Bank of India.	RBI Press Release :- Draft guidelines on constituting Board of Management in Primary (Urban) Co-operative Banks dated 25/06/2018
४९	**संचालक मंडळाच्या समित्या:-** संचालक मंडळाची, कार्यकारी समिती आणि इतर समित्या किंवा उपसमिती ज्या आवश्यक आहेत त्या असतीलच. तसेच प्रत्येक समितीमध्ये पाच पेक्षा जास्त सदस्य नसावेत.	**अ) संचालक मंडळाच्या समित्या:** संचालक मंडळाची, कार्यकारी समिती आणि इतर समित्या किंवा उपसमिती ज्या आवश्यक आहेत त्या असतीलच. तसेच प्रत्येक समतीमध्ये पाच पेक्षा जास्त सदस्य नसावेत. तसेच संचालक मंडळाने त्या समित्यांना व समितीमधील सदस्यांना त्यांच्या कामाची व्याप्ती व त्यांचे अधिकार यांचा त्यामध्ये समाविष्ट कारावा. ब) संचालक मंडळाचे व्यवस्थापन मंडळ असेल. व्यवस्थापन मंडळामधील सदस्य संख्या, त्यांची पात्रता, बैठकी, बैठकीचे शुक्ल व व्यवस्थापन मंडळाच्या कामकाजाचा निर्णय संचालक मंडळाद्वारे भारतीय रिजर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार निश्चित केला जाईल.	भारतीय रिजर्व बँक प्रकाशन:- दिनांक २५।०६।२०१८ रोजीच्या प्राथमिक (शहरी) सहकारी बँकांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व्यवस्थापन मंडळाची स्थापना करण्याबाबतीत मसुदा.

आर्थिक दृष्ट्या सक्षम व उत्तम व्यवस्थापित बँक (FSWM Bank)

आपल्या बँकेने रिझर्व्ह बँकेच्या 'फायनान्शियली साऊंड अॅन्ड वेल मॅनेज्ड' बँकेचे सर्व निकष जाहिर केले असून ज्या बँका खालील नमूद निकषांची पूर्तता करतात अशा बँकेस 'आर्थिक दृष्ट्या सक्षम बँक व उत्तम व्यवस्थापित बँक' समजली जाते. ते खालील प्रमाणे-

अ. क्र.	निकष	बँकेची दि. ३१ मार्च २०१८ अखेरची स्थिती
१	बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १०% पेक्षा कमी नसावा	आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.३६% आहे.
२	ग्रॉस एन पी ए ७% पेक्षा जास्त नसावा व नेट एन पी ए ३% पेक्षा कमी असावा	बँकेचा ग्रॉस एन पी ए ३.३२ % व नेट एन पी ए १.७२% आहे.
३	बँकेने संपूर्ण वर्षात सी आर आर ४% व एस एल आर किमान १९.२५% ठेवणे आवश्यक या मध्ये डिफॉल्ट नसावा	बँकेने सदर बाबींची पुर्तता केली आहे.
४	बँकेस सलग गत ४ वर्षा पैकी ३ वर्ष नफा झालेला असावा व लगतच्या वर्षात तोटा नसावा	बँकेस आर्थिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ , २०१७-१८ व २०१८-१९ अखेर निव्वळ नफा अनुक्रमे रु. ४१.८५ लाख,रु. ५६.५१ लाख व रु. ६६.६८ लाख व रु. १०१.२८ लाख झाला आहे.
५	अंतर्गत नियंत्रण मजबूत असावे व दोन तज्ञ संचालक संचालक मंडळामध्ये असावे.	बँकेने सदर बाबींची पुर्तता केली आहे.
६	बँकने रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी काढलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी करुन बी आर अॅक्ट १९४९ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अॅक्ट १९३४ मधील तरतुदीचे पालन केलेले असावे. बँकेवर गत २ वर्षामध्ये रिझर्व्ह बँकेच्या आदेशाचे उल्लंघन केले बाबत कोणतीही दंडात्मक कारवाई झालेली नसावी	बँकेने रिझर्व्ह बँकेने परिपत्रकाचे व कायद्यातील विविध तरतुदीचे पालन केले आहे. व बँकेस कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई झालेली नाही.
७	बँकेने सी बी एस प्रणालीचा स्विकार केला पाहिजे	बँकेने सन २०१४ पासूनच सी बी एस प्रणाली मध्ये कामकाज सुरु केले आहे.
८	बँकेने प्रायोरिटि सेक्टर कर्जाचे निकष ९०% व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक कर्ज १०% व मायक्रो एंटरप्राईजेस अंतर्गत ७.५०% कर्जे वितरित करणे बंधनकारकर आहे.	दि. ३१ मार्च २०१९ अखेर प्रायोरिटि सेक्टर अंतर्गत बँकेने ९५.८९ % कर्जे वितरीत केली असून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक अंतर्गत ९०.३३ % व मायक्रो एंटरप्रायजेस अंतर्गत ३७.१५% कर्जे वितरीत केली आहेत.

आपली बँक '' आर्थिक दृष्टचा सक्षम बँक व उत्तम व्यवस्थापित बँक'' या निकषाची पुर्तता करीत आहे.
दि. ३१ मार्च २०१९ अखेर बँक वरील सर्व निकषाची पूर्तता करित असल्याने आपल्या बँकेचा Financial Sound and Well Managed Bank या वर्गवारीत समावेश होत असल्याची नोंद घेणेत आली.

माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेले उपक्रम

माण देशी उद्योगिनी :-

सध्या महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकमध्ये माण देशी उद्योगिनी व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या ११ शाखा असून फिरत्या व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या ९ शाखा आहेत, एकूण ४,०६,६९७ महिलांनी व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घेवून आपले व्यवसाय यशस्वी केले आहेत. सन २०१८-२०१९ मध्ये माण देशी उद्योगिनी ने आपल्या कार्याचा विस्तार महाराष्ट्रातील अजून एक जिल्हा लातूर येथे वाढविला आहे.

''माझं धाडस हेच माझं भांडवल'' असे म्हणत ग्रामीण भागातील, कधीही घराच्या बाहेर न पडणाऱ्या महिला आज स्वत:च्या पायावर उभ्या आहेत आणि स्वत: व्यवसाय करु लागल्या आहेत. त्यांच्यामध्ये जो आत्मविश्वास वाढलेला आहे त्याला तोडच नाही. स्वत:चा व्यवसाय स्वत: करुन आपले कुटुंब चालवीत आहेत.

सिल्वासा शाखेमध्ये शेती विषयक माहितीमध्ये - मशरुम या कोर्ससाठी खूप मागणी आहे आणि हा कोर्स केल्यानंतर तेथील महिलांचे उत्पन्न २००० ते २०००० पर्यत होऊ लागले आहे.

शेळीसखी हा कार्यक्रम खूप छान चालला आहे. या कार्यक्रमांतर्गत कृत्रिम रेतन, लसीकरण, शेळ्यांच्या आजारावर उपचार, शेतकऱ्यांसाठी शेळी पालन हे कार्यक्रम राबविण्यात येतात. शेतकरी आपल्या शेळ्यांना कृत्रिम रेतन करुन घेत आहेत आणि त्याचा निकाल ७०-७५% आहे. शेळी सखी आठवडा बाजारामध्ये टेबल लावतात तेव्हा ही लोकांची बियाणांसाठी खूप मागणी आहे. या कार्यक्रमातर्गत सन २०१८-१९ मध्ये एकूण ४१६५७ शेतकऱ्यांपर्यंत- कृत्रिम रेतन १०७४, शेळ्यांवर प्रथमोपचार ३६३३, शेळ्या आणि कोंबड्यांचे लसीकरण ६२८६४ केलेले आहे. तसेच शेळी पालन प्रशिक्षण २२१ शेतकऱ्यांना दिलेले आहे.

माण देशी ग्रामीण उद्योजकाचे व्यासपीठ:-

माण देशी ग्रामीण उद्योजिकांच्या व्यासपीठामध्ये एकूण ५ केंद्र व ८ शाखा आहेत त्यामध्ये एकूण ७८,५१० महिलांना व्यवसाय वाढविण्याचे व्यासपीठ मिळवून दिले आहे व त्यांनी ते यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. माण देशी ग्रामीण महिला या व्यवसायासाठी डिजीटल पेमेंट, भीमॲप तसेच फेसबुक, व्हॉटस्ॲप इत्यादीचा त्यांच्या व्यवसायासाठी वापर करीत आहेत. नवीन बाब म्हणजे महिला ॲमेझोन सहेलीवरती पण स्वत:चा माल विकू लागल्या आहेत. तसेच महिला एकट्या मुंबईसारख्या शहरांमध्ये जाऊन स्वत: आपला स्टॉल लावू लागल्या आहेत. तसेच या महिला आपापसात मालाची देवाण-घेवाण करु लागल्या आहेत. सन २०१८-१९ मध्ये माण देशी ग्रामीण उद्योजिकांच्या व्यासपीठाने आपल्या कार्याचा विस्तार महाराष्ट्र राज्यामधील चिपळूण येथे वाढविला आहे.

माण देशी महोत्सव मुंबई:- ज्या माण देशी महोत्सवाची मुंबईकर आतुरतेने वाट पाहत असतो त्या महोत्सवामध्ये जानेवारी २०१९ मध्ये मुंबई मधील प्रभादेवी येथे जवळपास ९० स्टॉलचे नियोजन करण्यात आले होते. माण देशातील बारा बलुतेदारांचा समाजाला विसर पडला आहे त्यांना एका छताखाली आणून नव्या पिढीला त्यांच्या कलाकुसरीची माहिती व्हावी या उद्देशाने बारा बलुतेदारांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येते. गजी नृत्य व जात्यावरील डाळ दळताना महिलांनी अनेक गाणी व ओव्या म्हणटल्या हे माण देशी महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. माण देशीच्या कलेची आणि श्रमाची कदर व्हावी असा उद्देश यामागे आहे. याशिवाय रेडिओच्या सामाजिक आर जे केराबाई यांच्या गाण्यांची सीडी व पुस्तकाचे उद्घाटन करण्यात आले. माण देशा बरोबर नाशिकमधील निरगुडीचे तेल, सिल्वासाचे पतंग यासह असा वेगवेगळा व भरभरुन गर्दीने माण देशी महोत्सव संपन्न झाला. मुख्य पाहुण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. सिंधुताई सपकाळ होत्या. त्यांच्या विचारांनी सर्व उपस्थित भारावून गेले.

माण देशी वेअरहाऊस:- माण देशी फौंडेशनने बजाजच्या सहकार्याने म्हसवड येथे शेतकऱ्यांकरिता १५०० मे. टन क्षमतेचे वेअर हाऊस (वखार) ची निर्मीती केली आहे. कृषी उत्पादनाच्या सुगीच्या काळात ज्यावेळी शेतकरी आपला कृषीमाल विक्रीस बाजारपेठेत नेतात. त्यावेळी मालाची आवक वाढल्याने कृषीमालाला योग्य भाव मिळत नाही. म्हणून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. माल योग्य ठिकाणी साठविण्यासाठी शेतकऱ्यांकडे योग्य व्यवस्था नसते. त्यामुळे शेतकरी मिळेल त्या किमतीला माल विकतो आणि त्याला त्याचा तोटा सहन करावा लागतो. यामुळे शेतकऱ्यांच्या अन्नधान्याची शास्त्रोक्त पद्धतीने साठवणूक केली जाणार आहे. याचा फायदा माण-खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. या वेअरहाऊस मध्ये मका, बाजरी, गहू, ज्वारी, मुग, हरभरा इ. मालाची साठवणूक करता येईल. वेअरहाऊस मध्ये येत्या खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना मालाची साठवणूक करता येईल.

माण देशी तरंग वाहिनी म्हसवड (कम्युनिटी रेडिओ):-

माण देशी फौंडेशन संचलित माण देशी तरंग वाहिनी म्हसवड सामुदायिक रेडिओ केंद्र माण देशी जनतेचा सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. या वाटचालीस १० वर्ष पूर्ण झालेली आहेत. माण देशी समुदायास भेडसावणाऱ्या समस्या प्रामुख्याने दुष्काळ, पिण्यासाठी - शेतीसाठी पाणी, शेतीमधील आधुनिक प्रयोग, उद्योग आणि आर्थिक साक्षरता यावर आधारित जागरुकता वाढविणारे असे माहिती पूर्ण कार्यक्रम तयार करण्यावर माण देशी रेडिओ प्रयत्नशील आहे.

लोकसभा निवडणूक २०१९ मध्येही मतदान जागरुकता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम निर्मीती झाली. माण देशी समुदायाचा रेडिओ कार्यक्रम निर्मितीत सहभाग वाढविण्यासाठी शालेय वाणी आणि ''माण देशी रेडिओ सखी मंच'' या दोन उपक्रमाची सुरुवात माण देशी रेडिओ तरंग वाहिनी करीत आहे.

माण देशी चॅम्पियन्स युथ डेव्हलपमेट सेंटर, म्हसवड :-

महाराष्ट्रातील आज अनेक कुटुंबे दुष्काळाने बाधित झाली आहेत. त्यात आपला खटाव-माण तालुका म्हणजे कमी पर्जन्यछायेचा प्रदेश कायम दुष्काळी असलेल्या या भागात प्रामुख्याने शेती ही पावसाच्या जीवावर केली जाते. कोणतीही पाण्याची सुविधा नसल्याने शेती उत्पन्न हे देखील तुटपुंजे व औद्योगिक वसाहत देखील नाही त्यामुळे नोकरी किंवा रोजगार उपलब्ध नाही. यामध्ये अधिकारी होण्याचे व शासकीय नोकरी मिळवण्याचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी हा मोठा घटक आहे. घरची हालाखीची परिस्थिती कायमस्वरुपी बदलण्याच्या त्यांच्या महत्वकांक्षेत दुष्काळासारखी आपत्ती एक मोठा अडथळा ठरतो. त्यामुळे हे दृष्टचक्र भेदण्यासाठी व यशस्वी करियर घडवण्यासाठी मुलींनी आपल्या आयुष्यात धाडसी, निर्णयक्षम, स्वावलंबी, तंदुरुस्त, निरोगी बनण्यासाठी माण देशी फौंडेशनने ''माण देशी चॅम्पियन्स युथ डेव्हलपमेंट सेंटरची'' स्थापना केली आहे. या सेंटरमध्ये सध्या १२० च्या वर मुली प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षणाच्या माध्यमातून विविध स्पर्धा परीक्षा लेखी व मैदानी प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास व मुलाखत प्रशिक्षण, दररोज सकस अल्पोहार, स्पोर्ट किट व शूज ग्रंथालय सुविधा इत्यादी मोफत दिल्या जातात. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून दहिवडी सेंटर मधील कु. प्राजक्ता शिंदे हिची पुणे येथील टाटा कन्सलटन्सी येथे निवड झाली. सध्या दहिवडी व आटपाडी येथे हे सेंटर अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु आहेत. या उपक्रमास विविध महाविद्यालयातून व समाजातून मुलींचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल म्हसवड:-

माण देशी चॅम्पियन्स क्रीडा संकुल म्हसवड हे ग्रामीण भागातील मुली आणि मुलांना खेळाचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने तयार केले आहे. त्यात माण देश हा दुष्काळी भाग म्हणून या मैदानावर ग्रामीण भागातील मेंढपाळ, उसतोड कामगार, मजूर शेतकरी, मातीकाम करणाऱ्या मुलांना विनामूल्य खेळाचे योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण तसेच मुलांना पौष्टीक आहार माण देशी फौंडेशन संचलित माण देशी चॅम्पियन्स क्रिडा संकुल म्हसवड मार्फत दिला जातो. येथे प्रशिक्षण देण्यासाठी चार प्रशिक्षकाची नियुक्ती केली आहे.

माण देशी चॅम्पियन क्रीडा संकुल ची स्थापना १७ डिसेंबर २०१० साली झाली. माण देशी मैदानावर ४०० मीटरचा रनिंग ट्रॅक आहे. तसेच वेगवेगळ्या खेळाची मैदाने आहेत. हा रनिंग ट्रॅक हा ग्रामीण भागातील गरीब गरजू मुली आणि मुले क्रीडाप्रेमीसाठी करण्यात आला आहे. येथे खेळाडूंना वेगवेगळ्या खेळाचे प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले जाते. सन २०१० ते २०१९ या कालावधीत या मैदानावर ४८०० विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. या खेळाडूंना आपण कीट आणि शूज ही मोफत वाटप करतो. त्यांना पोषक आहार शेंगदाणे, गूळ, केळी, खजूर दररोज देतो. माण देशी चॅम्पियन्स क्रीडा संकुलच्या मैदानावर प्रशिक्षण घेऊन अनेक खेळाडू राष्ट्रीय पातळीवर गेले आहे.

फार्म टू मार्केट(शेतकऱ्याच्या मालाला बाजारपेठ):-

माण तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकरी सक्षम होण्याकरिता माण देशी फौंडेशनने २०१७ साली फार्म टू मार्केट या प्रकल्पाला सुरुवात केली. या प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करणे व उत्पादीत केलेल्या कृषीमालाला थेट बाजारपेठ मिळवून देऊन शेतकऱ्यांना फायदा मिळवून देणे या उद्देशाने हा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत माती परिक्षण, कृषी विषयक मार्गदर्शन विविध शासकीय योजनांची माहिती, कृषी अभ्यास सहली, गट शेतीला चालना देण्यासाठी शेतकरी महिला बचत गटांची स्थापना करणे, कृषीमाल विक्री विषयी मार्गदर्शन इ. कार्यक्रम या प्रकल्पांतर्गत राबवले जातात. या प्रकल्पांतर्गत जवळपास ३००० शेतकरी जोडले गेले आहेत व जवळपास २५०० मे. टन कृषीमाल विक्रीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

माण देशी बंधारा:-

माणचा भाग म्हणजे पाण्याचे दुर्भिक्ष, नेहमी या भागाला निसर्गाची साथ नाही. कुठलीच मुलगी लग्न करून माणला यायला तयार होत नसे. कारण दररोज सकाळी उठून पाण्यासाठी ५ किलोमिटर पायपीट करावी लागायची. माण देशीने बांधलेल्या बंधाऱ्यामुळे या सर्व भागांचा कायापालटच झाला हे उद्‌गार आहेत माणच्या शेतकऱ्यांचे. दुष्काळी भागातील भीषण चित्र उघड्या डोळ्यांनी पाहिले आणि माण देशातील लोकांचे दु:ख दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी ध्यास घेत रात्रंदिवस परिश्रम घेतले. माण देशी फौंडेशनच्या माध्यमातून म्हसवड परिसरातील गावामध्ये कोट्यावधी रुपये खर्चून १६ अद्ययावत बंधारे बांधले आहेत. त्यामध्ये सरासरी सुमारे प्रती बंधारा १० कोटी लिटर इतकी पाणी साठवण क्षमता असून माण देशीने बांधलेल्या बंधाऱ्यामुळे १३४६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आलेले आहे आणि जवळपास ३३६६ शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला आहे. शेतकऱ्यांच्या शिवारात हरितक्रांती झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत आहे. शेतकरी त्यांच्या शेतात विविध पिकांचे भरघोस उत्पन्न घेत आहे.

****

✻ अभिनंदन ✻

माण देशी चॅम्पियन्स अभय केळकर रा. सातारा फुल आर्यन मॅन खेळाडू असून त्यांनी ३० जून २०१९ ते ०२ जुलै २०१९ पर्यंत नॉर्वे युरोप येथे झालेल्या ''ट्रायथलॅन स्पर्धेत'' ३५ व्या क्रमांने आयर्न मॅन होण्याचा किताब मिळवला आहे.

माण देशी चॅम्पियन्स खेळाडूंनी खालीलप्रमाणे वेगवेगळ्या स्पर्धामध्ये पदक मिळवून यश संपादन केले आहे.

* कु. वैष्णवी सावंत रा. पुळकोटी स्टीपल चेस मध्ये दि. २५ जून २०१९ रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सिल्व्हर पदक मिळवले.
* कु. अदिती बुगड हिने थाळी फेक या स्पर्धेत फेब्रुवारी २०१९ मध्ये राष्ट्रीय युथ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप रायपुर येथे सिल्व्हर पदक मिळवले.
* कु. रेश्मा केवटे हिने गोवा येथे ०३ फेब्रुवारी २०१९ रोजी हाफ मॅरेथॉन मध्ये गोल्ड पदक मिळवले.
* कु. काजल जाधव हिने खेलो इंडिया-२०१९ पुणे येथील कुस्ती स्पर्धेमध्ये गोल्ड पदक मिळवले.
* हर्षद खांडेकर यांनी दि. २३ जून २०१९ रोजी विसापूर येथे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत माण देशी चॅम्पियन्स गोल्ड मेडल, तसेच सोमनाथ गोरड - गोल्ड मेडल, रोहित विरकर- ब्रॉँझ मेडल, जीवन खरात- ब्रॉँझ मेडल चे मानकरी ठरले.

या सर्वांचे माण देशी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीससाठी शुभेच्छा!

****

* श्रद्धांजली *



* ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, प्रभावी, वक्ते आणि मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती पद्मभूषण मा. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे दि.०३ जानेवारी २०१९ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

* माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांचे दि. १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. भारतीय राजकारणातील एका प्रदीर्घ,देदीप्यमान आणि सहिष्णू युगाची समाप्ती झाली आहे.

* गोव्याचे मुख्यमंत्री आणि भारताचे माजी संरक्षणमंत्री मा.मनोहर पर्रीकर यांचे दि. १७ मार्च २०१९ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

* माजी परराष्ट्रमंत्री मा. सुषमा स्वराज यांचे दि. ०६ ऑगस्ट २०१९ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. मा. सुषमा स्वराज यांच्या निधनाने एका मितभाषी आणि तितक्याच कणखर नेतृत्वाला देश मुकला आहे.



* माजी अर्थमंत्री मा. अरुण जेटली यांचे दि. २४ ऑगस्ट २०१९ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



* श्रीमती चेतना सिन्हा यांचे वडील श्री.मगनलाल गाला(बापूजी), वापी यांचे दि. १० जून २०१९ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

* जम्मू-काशमीर येथील पुलवामामध्ये दि. १४ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या भ्याड दहशतवादी हल्यामध्ये शहीद झालेल्या भारतीय जवानांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धाजंली.

आभार

सध्याच्या बँकींग क्षेत्रातील जागतिक स्पर्धेमध्ये वाढती जबाबदारी स्विकारुन, अग्रेसर राहण्याचा विश्वास आपणा सर्वांमध्ये निर्माण झाला आहे. विविध प्रकारच्या ठेवी व कर्जवाटपाच्या योजना राबवून सभासदांची आर्थिक व सामाजिक प्रगती करताना त्यांच्या शैक्षणिक व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावयाचे आहे. या कामात सर्व सहकारी संस्था,संचालिका,सेवकवर्ग, सभासद, ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक यांचे पूर्ण सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

मी वैयक्तिकरित्या मा. श्री. शक्तीकांता दास ,गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक, मा. श्रीमती उषा थोरात माजी डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.डॉ. श्री. के. सी. चक्रवर्तीसाहेब माजी डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा.श्री. एन.एस.विश्वनाथन डेप्युटी गव्हर्नर भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा. रिना बॅनर्जी, मुख्य महाप्रबंधक भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा. उमा शंकर, मुख्य महाप्रबंधक भारतीय रिझर्व्ह बँक मुंबई, मा. श्री. अमिताभ कांत सी.ई.ओ. निती आयोग दिल्ली, मा.श्रीमती मधुमिता सरकार देब प्राचार्य कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल आर. बी. आय. पुणे, मा. श्री. सतीश सोनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, मा.सौ. श्वेता सिंघल जिल्हाधिकारी सातारा, मा. श्री. प्रकाश अष्टेकर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा,
मा. सौ. तेजस्वी सातपुते पोलीस अधिक्षक सातारा, मा. श्री. संजय भागवत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा, मा. सौ. विजया बाबर सहा. निबंधक सहकारी संस्था दहिवडी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे आजी माजी अधिकारी वर्ग, मा. श्री. ज्योतिंद्र मेहता, अध्यक्ष नॅफकब दिल्ली, मा. श्री. विद्याधर अनास्कर अध्यक्ष महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन मुंबई, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक मुंबई, मा.श्री. व्ही. डी. सावंत,लेखापरिक्षक अधिकारी सातारा,बँक ऑफ इंडियाचे अधिकारी वर्ग,सातारा जिल्हा नागरी बँक असोसिएशन सातारा, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा, आय.डी.बी.आय.बँक, एस.बी.आय.बँक, ॲक्सिस बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, यस बँक पुणे, सीडबी मुंबई, नाबार्ड, कोटक लाईफ इन्शुरन्स, कायदेविषयक सल्लागार, लेखापरिक्षक, अंर्तगत लेखापरिक्षक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि.,वृत्तपत्र संपादक, सातारा व पुणे जिल्हा वार्ताहर, महाराष्ट्र शासन, तसेच बँकेच्या प्रगतीस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रितीने सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे हार्दीक आभार !

धन्यवाद !

जयहिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

आपली स्नेहांकित

श्रीमती चेतना सिन्हा

अध्यक्षा

''माण देशी महोत्सव मुंबई २०१९'' मध्ये जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. सिंधुताई सपकाळ यांनी महोत्सवास भेट देवून महिलांनी लावलेल्या स्टॉलचे कौतुक केले व त्यांना पुढील वाटचीसाठी मार्गदर्शन केले समवेत श्रीमती चेतना सिन्हा.

पैसा बझार फिन्टीग्रेट झोन यांच्या तर्फे टॉप २० महिलांना ''फिनटेक पुरस्कार'' ने सन्मानित करण्यात आले त्यावेळी श्रीमती चेतना सिन्हा यांच्या वतीने सी.एफ.ओ. सौ. सुषमा शेंडगे यांनी पुरस्कार स्विकारला त्याप्रसंगीचे छायाचित्र

निती आयोग व ॲक्सेस डेव्हलपमेंट संस्थेतर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांना २०१८ चे "Inclusive Finance India 2018" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्रीमती चेतना सिन्हा (टेड स्पीकर) यांना ''TED Conference 2018'' मध्ये माण देशी महिला सह बँक व माण देशी फौंडेशनच्या कार्याची माहिती देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते हा कार्यक्रम वॅनकुव्हर, कॅनडा येथे संपन्न झाला.



दि. १० जुलै २०१९ रोजी माण देशी बँकेमार्फत ''आठवडा बाजार कर्ज योजना'' व ''गटकर्ज वाटप योजना'' यामधील कर्जदार व सहकर्जदारांचा विमा उतरविला जातो. या योजेनेअंतर्गत पतीचे निधन झालेल्या अलका जाधव महिला कर्जदारास विम्याच्या रक्कमेचा धनादेश देताना श्रीमती चेतना सिन्हा व बँकेच्या संचालिका

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळचे संस्थापक, संचालक, ज्येष्ठ नेते माजी आ. स्व. डॉ. आप्पासाहेब उर्फ सा. रे. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. ०१ एप्रिल २०१९ रोजी ''समाजभूषण जीवन गौरव पुरस्कार'' श्रीमती चेतना सिन्हा यांना माजी निवडणूक आयुक्त मा. नीला सत्यनारायण यांच्या हस्ते देण्यात आला समवेत श्री. गणपतराव पाटील अध्यक्ष, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ

''माझे जितराब हिच माझी संपत्ती'' या जनावरांच्या चारा छावणीच्या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई येथे करण्यात आले. समवेत मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील मंत्री महसूल व पुनर्वसन महाराष्ट्र, मा. श्री. पाशाभाई पटेल, अध्यक्ष राज्य कृषी मूल्य आयोग महाराष्ट्र, श्री. सजल कुलकर्णी, प्राणी जैव विविधता संवर्धन, डॉ. श्री. अतुल जोशी, सी.ई.ओ. जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था, श्री. प्रसन्न जोशी, वरिष्ठ निर्माते/डिजिटल लेखक एबीपी माझा व चारा छावणीमधील शेतकरी

मुंबई येथे माण देशी महोत्सव २०१९ चे उद्घाटन मा. श्री. सुभाष देसाई उद्योगमंत्री, महाराष्ट्र मा. श्री. श्रीपाद हळबे अध्यक्ष जनकल्याण चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, श्री. सुधीर शेनॉय, सी.ई.ओ. डाव केमिकल कंपनी, श्री. महेश झुरळे ॲक्सेंचर टेक्नोलॉजी, पुणे व माण देशी महिला

अर्जेंटिना येथे G 20 म्हणजेच जगातल्या वीस देशांच्या शिखर संमेलन मध्ये भारतातर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांनी प्रतिनिधीत्व केले समवेत अर्जेंटिनाच्या राष्ट्रपती यांच्या पत्नी जुलियाना आवाडा

महिला व बालविकास मंत्रालय भारत सरकार यांच्या तर्फे श्रीमती चेतना सिन्हा यांना महिला सबलीकरणामध्ये योगदान म्हणून ''नारी शक्ती'' पुरस्काराने राष्ट्रपती मा. रामनाथ कोविंद यांचे हस्ते दि. ०८ मार्च २०१९ रोजी राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे गौरविण्यात आले.

माण देशी बँक

Under Certificate of Posting

प्रेषक :

श्रीमती चेतना सिन्हा

अध्यक्षा, माण देशी महिला सहकारी बँक लि.

म्हसवड, ता. माण, जि. सातारा.

फोन : (०२३७३) २७०१४१,

फॅक्स : (०२३७३) २७०७८८

website : www.manndeshibank.com

email : bank@manndeshi.org.in

मुखपृष्ठ छायाचित्रकार : नितेश सविता

मुद्रक : **ओम प्रिंटर्स, म्हसवड**

फोन : (०२३७३) २७०२८८

सभासद क्र.

बुक पोस्ट

प्रति,

सौ./श्रीमती ____________________

____

____